**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः18.12.2024** **वारःबुधवार**

---

ठळक बातम्या

- राज्यघटना उपेक्षितांच्या कल्याणासाठी आणि राष्ट्र उभारणीसाठी मूलभूत प्रेरणा असल्याचं गृह मंत्री अमित शहा याचं प्रतिपादन
- एक देश एक निवडणुकीसंदर्भातलं विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा निर्णय
- लोकसभेमध्ये काल 87 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर
- भारत चीन विशेष प्रतिनिधींच्या चर्चेत द्वीपक्षीय संबंध पुनरूज्जीवित करण्यावर चर्चेची शक्यता.
- कृषी अर्थसंकल्पात गेल्या दहा वर्षात सहा पटीनं वाढ आणि
- बॉर्डर गावस्कर करंडक क्रिकेट मालिकेल्या तिसऱ्या सामन्यात पावसाचा व्यत्यय, फॉलोऑन टाळण्यात भारत यशस्वी

राज्य घटना राज्यसभा

राज्यघटना उपेक्षितांच्या कल्याणासाठी आणि राष्ट्र उभारणीसाठीची मूलभूत प्रेरणा असून, संविधानामुळे लोकशाहीची मुळे मजबूत झाल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल राज्यसभेत केलं. संविधानामुळेच रक्ताचा थेंब न सांडता सत्ता हस्तांतरण सुरळीत झाल्याचंही शहा म्हणाले. राज्यघटनेच्या गौरवशाली अमृतमहोत्सवी वाटचालीविषयी आयोजित विशेष चर्चेला ते उत्तर देत होते. काँग्रेसच्या ५५ वर्षांच्या राजवटीत राज्यघटनेत अनेक दुरुस्त्या करून अवमान केल्याचा आरोप त्यांनी केला. आर्थिकदृष्ट्या भारत कधीही स्वतंत्र होणार नाही असं म्हणणाऱ्यांना आज जगातली पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होऊन देशातल्या जनतेने आणि संविधानाने चोख प्रत्युत्तर दिलं आहे. गेल्या पंच्चाहत्तर वर्षात संविधानामुळे लोकशाहीचा पाया अधिक घट्ट झाल्याची जाणीव नागरिकांना होईल असंही शहा म्हणाले. राज्यघटनेच्या मार्गदर्शक सूचनांच्या ४४ व्या कलमात समान नागरी कायद्याचा उल्लेख केला असून आपलं संविधान सर्व धर्मांसाठी समान कायद्याच्या बाजूचं आहे, असं ते म्हणाले. उत्तराखंडमधल्या भाजप सरकारनं राज्यात समान नागरी कायदा आणला असून भाजप प्रत्येक राज्यात तो लागू कले असं प्रतिपादन शहा यांनी यावेळी केलं.

विधेयक

केंद्र सरकारनं 'एक देश एक निवडणूक' या संदर्भातील विधेयकं व्यापक विचारविनिमयासाठी संयुक्त संसदीय समितीकडे पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. या विधेयकांवर प्रत्येक स्तरावर सविस्तर चर्चा व्हावी म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतःच  हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवावं, असं सुचविलं होतं , असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत सांगितलं.  केंद्रीय कायदेमंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी एकाचवेळी निवडणुका घेण्यासाठी संविधान (एकशेवीसवी सुधारणा) विधेयक, 2024 आणि केंद्रशासित प्रदेश कायदा (सुधारणा) विधेयक, 2024 सादर केल्यामुळे लोकसभेत गदारोळ होत असतानाच शहा यांनी ही बाब स्पष्ट केली. ही विधेयके लोकसभेत मांडल्यानंतर लगेचच विरोधी पक्षांच्या नेत्यांनी त्यावर आपले आक्षेप नोंदवले. संसदेच्या कनिष्ठ सभागृहात विधेयके सादर करताना सरकार ही विधेयकं  संयुक्त संसदीय समितीकडे  पाठवण्यास तयार आहे, असं मेघवाळ यांनी सांगितलं होतं .  एका विधेयकावरील आक्षेप हे राजकीय स्वरूपाचे असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. देशात लोकसभा आणि राज्य विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेणे हे दोन्ही विधेयकांचे उद्दिष्ट आहे.

लोकसभा पुरवणी

लोकसभेमध्ये काल एकंदर 87762 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर झाल्या आहेत. त्यापैकी कर्ज, देणी आणि व्याजदर देण्यासाठी एकूण 44 हजार 142 रुपयांच्या निव्वळ रोख रकमेचा समावेश आहे. सभागृहात झालेल्या चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी भारतीय अर्थव्यवस्था सर्वात वेगाने विकसित होत असून, गेल्या तीन वर्षात सकल गृह उत्पन्नात सरासरी 8 पूर्णांक 3 दशांश टक्के होता असल्याचं नमूद केलं. केंद्र सरकारनं अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधांसाठी 11 लाख कोटी रुपयांची तरतूद यंदाच्या अर्थसंकल्पात केली असून, येत्या काही वर्षात भारतीय अर्थव्यवस्था आणखी मजबूत होईल असं सीतारामन म्हणाल्या. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या काळात अन्न आणि इंधन महागाईत कमालीची घट झाल्याचं सांगून  युपीए सरकारच्या काळात महागाई दर 10 टक्क्यांच्या वर होता. आता हा दर 5  टक्क्यांच्या खाली असल्याकडे त्यांनी लक्ष वेधलं. बेरोजगारीचा दरही गेल्या 5 वर्षात निम्म्यावर आल्याचंही त्या म्हणाल्या.

डोवालचीन

भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आज बीजिंगमध्ये होणाऱ्या  भारत-चीन विशेष प्रतिनिधींच्या चर्चेत सहभागी होतील. पूर्व लडाखमध्ये लष्करी हस्तक्षेपामुळे चार वर्षांपासून रखडलेले द्वीपक्षीय संबंध पुनरूज्जीवित करण्याच्या उद्देशानं ही चर्चा होणार आहे. अजित डोभाल त्यांचे चीनचे समकक्ष आणि परराष्ट्रमंत्री वांग यी यांच्यातल्या चर्चेची ही 23 वी फेरी आहे. उभय देशांत पूर्व लडाखमध्ये झालेल्या करारानंतर, द्वीपक्षीय संबंधांसह इतरही अनेक मुद्द्यांवर चर्चा होईल अशी अपेक्षा आहे. चीन प्रामाणिकपणे मतभेद सोडवण्यासाठी तयार असल्याचं चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी वार्ताहरांशी बोलताना स्पष्ट केलं.

कृषीअर्थसंकल्प

कृषी अंदाजपत्रकात गेल्या दहा वर्षात सहा पटीनं वाढ झाल्याचं कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी काल एका लेखी उत्तरात दिली. 2013-14 मध्ये कृषी अंदाजपत्रक 21 हजार कोटी रुपये होतं त्यात वाढ होऊन 2024-25 मध्ये त्यात 1 लाख 22 हजार कोटी रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. त्याशिवाय शेतकरी कल्याणासाठी केंद्राकडून अनेकविध योजना राबवल्या जात असून, शेती हा राज्याचा विषय असल्याने राज्य सरकारांनी शेतीच्या विकासासाठी योग्य उपाययोजना करणे आवश्यक असल्याचंही या उत्तरात म्हटलं आहे.

पोशाख

विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्या हस्ते  काल नवी दिल्ली इथं 'किसान कवच' या कीटकनाशकविरोधी संपूर्ण पोषाखाचं अनावरण करण्यात आलं. कीटकनाशकांच्या हानिकारक परिणामांपासून शेतकऱ्यांचं संरक्षण करण्यासाठी हा पोशाख तयार करण्यात आला आहे. हा पोशाख धुता येणारा असून कीटकनाशकांच्या विषारी गुणधर्मापासून माणसाला संरक्षण देणारा आहे.

भारत नेपाळ स्टार्टअप

भारत-नेपाळ स्टार्टअप परिषद 2024 कालपासून नेपाळमध्ये काठमांडू इथं सुरू झाली. उभय राष्ट्रांमधील सहकार्य आणि नवोन्मेष यांना प्रोत्साहन देण्यासाठी या परिषदेत उद्योजक, गुंतवणूकदार आणि धोरणकर्ते एकत्र आले आहेत. स्टार्टअप जाळं निर्माण करण्यासाठी मंच तयार करणं, नवकल्पना मांडणं, विकास आणि गुंतवणुकीच्या संधी शोधणं हे या परिषदेचं उद्दिष्टं आहे. नेपाळला भेडसावत असलेल्या बेरोजगारी, परकीय मदतीवरील अवलंबित्व, व्यापार तूट अशा विविध आव्हानांना तोंड देण्यासाठी स्टार्टअप्स हे आशेचे किरण असल्याचं प्रतिपादन भारत-नेपाळ केंद्र पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स ॲंड इंडस्ट्रीचे सह-अध्यक्ष कमलेश जैन यांनी यावेळी केलं. स्थानिक स्टार्टअप आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदार यांच्यातील दरी कमी करण्याच्या उद्देशाने या शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आलं आहे.

कोरियन लष्कर प्रमुख

दक्षिण कोरियाचे लष्करप्रमुख पार्क एन सू यांना काल अटक करण्यात आली. दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष योन सूक येओल यांच्या अल्पकालीन लष्करी राजवटीत पार्क यांनी त्यांचे मुख्य कमांडर म्हणून काम पाहिले होते. त्यांच्यावर बंडखोरी तसंच सत्तेचा गैरवापर करण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याच्या आरोपाखाली  न्यायालयानं त्यांना अटक करण्याचा आदेश दिला. लष्करी कायदा लागू करण्याच्या असफल प्रयत्न केल्याप्रकरणी दक्षिण कोरियात आत्तापर्यंत पार्क यांच्यासहीत पाच जणांना अटक करण्यात आली आहे.

हमास युद्धविराम

गाझामधील युद्धविराम आणि ओलीस कैद्यांची सुटका करण्याच्या उद्देशानं काल दोहा इथं इस्रायल शिष्टमंडळाबरोबर झालेली चर्चा सकारात्मक झाल्याचं हमासनं म्हटलं आहे. पॅलेस्टिनी इस्लामी गटानं

जारी केलेल्या एका निवेदनात, या चर्चेच्या पार्श्वभुमीवर, नवीन अटी न लादल्यास युद्धविराम आणि कैद्यांची देवाणघेवाण करण्यासाठी समझोता करार करणे शक्य आहे असल्याचं म्हटलं आहे.

नेपाळ

नेपाळमध्ये गेल्या 13 डिसेंबरपासून सुरू झालेल्या भक्तपूर महोत्सवाला गेल्या पाच दिवसांत लाखो लोकांनी भेट दिली. त्यामुळे इथं प्रचंड गर्दी झाली होती. भक्तपूरच्या अद्वितीय आणि ऐतिहासिक कला, संस्कृती, उत्सव आणि जीवनशैलीची जगाला ओळख करून देणं हा महोत्सवाचा उद्देश होता. भक्तपूर हा काठमांडू खोऱ्यातील एक जिल्हा असून त्याच्या परिसरात भक्तपूर दरबार स्क्वेअर आणि चांगू नारायण मंदिर ही यूनेसकोची वारसा स्थळे आहेत. भक्तपूर दरबार चौकात पौभा चित्रकला प्रदर्शन आणि कांस्य, दगड आणि लाकडातील पारंपरिक शिल्पांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. सांस्कृतिक नृत्य सादरीकरणाच्या व्यासपीठावर पर्यटकांनी गर्दी केली होती. तिथं कलाकारांनी बाराही नृत्य आणि लाखी नृत्य सादर केले. विविध शाळांमधील संगीत बँड तसेच स्थानिक समुदाय गटांनी बासरी आणि पारंपारिक वाद्ये वाजवत वेगवेगळ्या रस्त्यांवर मिरवणुका काढल्या होत्या. स्थानिक लोकांनी बनवलेल्या हस्तकला वस्तू प्रदर्शनासह विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. कुंभार चौकात भक्तपुरातील समाज वापरत असलेल्या पारंपरिक मातीच्या भांड्यांचे प्रदर्शन भरवले होते. वनस्पती प्रेमींसाठी विविध प्रकारच्या शोभेच्या, फुलांच्या आणि फळझाडांच्या विक्रीसाठी व्यवस्था करण्यात आली होती.

बुद्धीबळ गुकेश

विश्वविजेता डी. गुकेश नं आगामी फिडे वर्ल्ड रॅपिड अँड बिल्टझ अजिंक्यपद स्पर्धेतून माघार घेतली आहे. या स्पर्धेत अर्जुन इरिगाईसी आणि आर. प्रग्यानंद भारताचे प्रतिनिधित्व करतील. ही स्पर्धा येत्या 26 ते 31 डिसेंबर दरम्यान न्यूयॉर्कमध्ये होणार आहे.

महिला क्रिकेट

महिला क्रिकेटमध्ये वेस्ट इंडिजनं काल नवी मुंबईत झालेल्या 20 षटकांच्या दुसऱ्या सामन्यात भारतावर नऊ गडी राखून मात केली. तीन सामन्यांच्या या मालिकेत दोन्ही संघाची 1-1 अशी बरोबर झाली आहे. वेस्ट इंडिजची कर्णधार हैले मॅथ्यूजनं 85 धावा केल्या. तिला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आलं. भारतानं वेस्टइंडिजसमोर 160 धावाचं लक्ष्य ठेवलं होतं.

क्रिकेट

बॉर्डर गावस्कर करंडक क्रिकेट मालिकेत तिसऱ्या सामन्याच्या पाचव्या दिवसाच्या खेळात पावसानं व्यत्यय आणल्यानं खेळ थांबला होता, तो उपहारानंतर पुन्हा सुरु झाला आहे. तत्पुर्वी भारतानं फॉलोऑन टाळण्यात यश मिळालं आहे. भारताच्या पहिल्या डावात सर्वबाद 260 धावा झाल्यानंतर यजमान ऑस्ट्रेलियाला 185 धावांची आघाडी मिळाली आहे.

या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.